C389

दिनांक ०५/१०/२०२०

# इतिवृत्त

यशदा आवारातील उद्यान विकसन व देखभाल दुरुस्ती या कामासाठी सन २०२०-२२ या कालावधीसाठी दिनांक २९/०९/२०२० ते १३/१०/२०२० या कालावधीमध्ये ई निविदा-मागविण्यात आल्या आहेत .

२. सदरच्या ई निविदेबाबतची-निविदापुर्व बैठक (Pre-bid meeting) दिनांक ०५/१०/२०२० रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती या बैठकीला खाली नमूद करण्यात आल्यानुसार यशदाचे प्रतिनिधी तसेच निविदादार /प्रतिनिधी उपस्थित होते.

| अ. क्र. | बैठकीसाठी उपस्थित असलेले यशदाचे प्रतिनिधी |
|---|---|
| १ | श्री. सतीश तडकसे, वित्तीय सल्लागार, |
| २ | डॉ. सुनिल धापटे, विभागप्रमुख स्थावर |
| ३ | श्री. दे. रा. शेळके, लेखाधिकारी तथा प्रमुख प्रापण, |
| ४ | श्री. प्रसाद आचार्य, उप निबंधक |
| ५ | श्री. दशरथ काळोखे, कनिष्ठ अभियंता, स्थापत्य |
| | **निविदादार /प्रतिनिधी** |
| १ | मे. जे. के एन्टरप्रायजेस, पुणे |
| २ | मे. निसर्ग लॅन्डस्केप प्रा. लि. पुणे |
| ३ | मे. साईराज ग्रीन, पुणे |
| ४ | रवी कानखर, पुणे |
| ५ | शाहूराज एन. शिंदे, पुणे |
| ६ | श्री रमेश देशमुख, पुणे |
| ७ | मनीष असोसिएटस, पुणे |

०३ वित्तीय सल्लागार यांनी सदर बैठकीतील चर्चेमध्ये सर्व कंत्राटदारानी अटी व शर्ती सविस्तर वाचाव्यात तसेच निविदा भरताना प्रत्यक्षात उद्यान विकसन व देखभाल कामांचे अनुभव प्रमाणपत्रे सादर करावीत. तसेच निविदेतील अटी व शर्तीनुसार सनदी लेखापालांचे विहित नमुन्यातील आवश्यक कालावधीचे आर्थिक वर्षाचे उलाढाल प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. असे सुचित केले.

०४ सदर बैठकीमध्ये सात निविदादार /प्रतिनिधी उपस्थित होते. निविदादारांकडुन काही मुद्दे उपस्थित करण्यात आले होते. त्यानुसार उपस्थित केलेल्या मुद्दयांवर व सादर केलेल्या निवेदनांवर दि. ०५/१०/२०२० रोजीचे खरेदी समितीच्या बैठकीमध्ये खालीलप्रमाणे सर्वानुमते निर्णय घेण्यात आले.

| अ. क्र. | निविदादारांनी उपस्थित केलेले मुद्दे | खरेदी समिती कडुन घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| १. | PWD Registration Certificate बंधनकारक/आवश्यक आहे का ? | निविदेतील पृष्ठ क्र. ५ वरील अट क्र. ३.१(a) कायम राहिल. |
| २. | C.P.W.D. Horticulture Licence ग्राह्य धरण्याबाबत मे. जे. के एन्टरप्रायजेस, पुणे यांनी पत्रान्वये विंनेती केली. | वैध PWD Registration Certificate ऐवजी वैध C.P.W.D. Horticulture Licence ग्राह्य धरण्यात येईल. |

(कृ.मा.प)

| | | |
|---|---|---|
| ३. | यशदा उद्यान कामाच्या साईटवर ५० पेक्षा कमी लेबर असल्याने लेबर लायसन्सची आवश्यकता नसल्याने महाराष्ट्र शासन निर्णयानुसार सदर अट शिथिल करण्यात यावी. | निविदेतील पृष्ठ क्र. ६ वरील अट क्र. ३.१(i) प्रमाणे राहिल. तथापि ज्यांच्याकडे सदर लेबर लायसन्स उपलब्ध नाही त्यांनी त्याच्याकडे लेबर उपलब्ध असलेबाबत प्रमाणिकरण करावे व शासन राजपत्र दिनांक ०५/०१/२०१७ (RNI NO :- MAHENG/2009/35528) तांत्रिक लिफाफ्यात अपलोड करावा. |
| ४. | निविदेतील अट क्र ३.१ (e) अटी व शर्तीनुसार शासकिय व निमशाकिय व्यतीरिक्त खाजगी क्षेत्रातील कामाचा अनुभव ग्राह्य धरण्यात यावा. | निविदेतील पृष्ठ क्र. ५ वरील अट क्र. ३.१(e) कायम राहिल. |
| ५. | कमीत कमी ११ मॅनपॉवर म्हणजे काय? असे मे. साईराज ग्रीन यांनी विचारणा केली होती. | १-सुपरवायझर<br>२-माळी कामगार<br>८-कामगार Unskilled (पुरुष/स्त्री) असे एकुण ११ व्यक्तींची कमीत कमी आवश्यकता आहे, तसेच यशदाचे अस्थायी ५ (पाच) बाग कामगार एजन्सीच्या देखरेखे खाली काम करतील असे सांगण्यात आले. |
| ६. | मे. साईराज ग्रीन यांनी अंदाजपत्रकीय किंमत किती ? असे विचारणा केली | सध्याच्या व निविदा कालावधीतील भविष्यातील अपेक्षित होणारी वाढ ग्राह्य धरुन कामासाठी लागणाऱ्या लेबरचे Minimum Wages Act प्रमाणे दरांचा अंदाज धरुन आणि निविदेतील अटी व शर्ती प्रमाणे देखभाल व विकास यासाठी लागणारे साहित्य् इत्यादी साठी लागणाऱ्या खर्चाचा विचार करुन एकत्रित निविदादर सादर करावेत.<br>तसेच सदर काम हे मॅनपॉवर वर आधारित नसून निविदेतील नमूद उद्यान देखभाल व विकास क्षेत्रफळासाठी प्रत्यक्षात झालेल्या/ होणाऱ्या उद्यान देखभाल व विकास कामाच्या मोजमापाच्या परिमानावर आधारित आहे. त्यामुळे भविष्यातील दरवाढ/फरक देण्यात येणार नाही. |
| ७. | मे. निसर्ग लॅन्डस्केप प्रा. लि. पुणे. यांनी एकाच मालकाच्या दोन वेगवेगळया Firm च्या नावाचे Turnover Certificate ग्राहय धरावे. अशी विनंती केली. | जेव्हा निविदा एकाच्या नावाने किंवा Firm ने भरले असले तर त्याच Firm चे Turnover certificate ग्राहय धरले जाईल. |

०५ प्राप्त निवेदनातील उपस्थित मुद्दे, तसेच निविदादारांनी निविदापुर्व बैठकीमध्ये उपस्थित केलेल्या शंकाचे निरसन वरील प्रमाणे करण्यात येत आहे.

०६ तसेच सदरचे इतिवृत्त यशदा आवारातील उद्यान विकसन व देखभाल दुरुस्ती सन २०२०-२२ या कामासाठीच्या ई-निविदा अटी-शर्तीचा भाग राहील.

(कनिष्ठ अभियंता, स्थापत्य) (विभागप्रमुख स्थावर) (प्रापण प्रमुख)

(उप निबंधक) (वित्तीय सल्लागार)